# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)
अमरावती विभागीय कार्यालय,
शेतकरी सदन, जुना कॉटन मार्केट, SBI- कृषि शाखेचे वर, अमरावती (महा.) ४४४६०१
दूरध्वनी - ०७२१ २५६७०६७, इमेल -amravati.ro@mswc.in

## जाहीर सूचना

मुंबई वेअरहाऊस कायदा, १९५९ च्या कलम १६(१) व त्या कायद्याखाली करण्यात आलेले मुंबई वेअरहाऊसेस अधिनियम, १९६० च्या नियम ३२(१) अन्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, तिवसा यांचेकडे वखार पावतीवरील खालील वर्णन केलेला साठा ठेविदार साठ्याची उचल करण्यास टाळाटाळ करत असल्याने / सकारात्मक प्रतिसाद देत नसल्याने साठा दिर्घकाळ साठवणुकीस असल्यामुळे साठ्याची प्रत खालावत आहे. म्हणून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, तिवसा वखार केंद्र यांच्या गोदाम क्रमांक "OU01" (पत्ता - म. रा. वखार महामंडळ, कृषी उत्पन्न बाजार समिती, मार्केट यार्ड, सातरगाव रोड, तिवसा, जि. अमरावती -४४४ ९०३. संपर्क क्रमांक ८८०५०१७४८५) येथे दिनांक १२.१२.२०२४ रोजी दु. ०२:०० वाजता हा माल जाहीर लिलावाने विक्री केला जाणार आहे.

### मालाचे वर्णन

| अ. क्र. | वखार पावती क्रमांक व दिनांक | मालाचे वर्णन / प्रकार | वखार पावतीवरील शिल्लक नग | वखार पावतीनुसार शिल्लक मालाचे परिमाण व किंमत | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वजन (क्विं.) | किंमत (रु.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १३३६१००२१९ / दि.२६.०७.२०१८ | कापूस गाठी | ४६ गाठी | ७३.६०० क्विं. | ८७४०००/- |
| २ | १३३६१००२२५ / दि.२७.०८.२०१८ | कापूस गाठी | ५० गाठी | ८०.००० क्विं. | १००००००/- |
| ३ | १३३६१००२२६ / दि.२७.०८.२०१८ | कापूस गाठी | ५० गाठी | ८०.००० क्विं. | १००००००/- |
| ४ | १३३६१००२२८ / दि.१४.०९.२०१८ | कापूस गाठी | ७० गाठी | ११२.००० क्विं. | १३३००००/- |
| ५ | १३३६१००२२९ / दि.१४.०९.२०१८ | कापूस गाठी | ५० गाठी | ८०.००० क्विं. | ९५००००/- |
| ६ | १३३६१००२३० / दि.२१.०९.२०१८ | कापूस गाठी | ६१ गाठी | ९७.६०० क्विं. | १२२००००/- |
| ७ | १३३६१००२३७ / दि.०१.१०.२०१८ | कापूस गाठी | ५० गाठी | ८०.००० क्विं. | ९०००००/- |

वखार पावतीवर शिल्लक असलेला माल जसा आहे, जेथे आहे, त्या स्थितीत (as is where is basis) या अटीवर जाहीर लिलाव पद्धतीने विक्री करायची आहे. सदर जाहीर लिलाव पद्धतीने विक्री असलेल्या साठ्याच्या खरेदी साठी खरेदीदारांने वरिल प्रमाणे नमुद तारखेला वेळेत तिवसा वखार केंद्रावर उपस्थित राहून बोली बोलावी लागेल. साठ्याची बोली वखार पावतीनिहाय, प्रती क्विंटल अथवा प्रती किलो दराने (जी लिलावाचे वेळी ठरविण्यात येईल) त्यानुसार बोलली जाईल. जाहीर लिलावात ज्या खरेदीदारांकडून सर्वात जास्त रकमेची (H1) बोली बोलली जाईल, ती रक्कम अंतिम ठरवली जाईल; अशा खरेदीदाराचे बोलीनुसार साठ्याच्या किंमतीच्या (वखार पावतीवरील नमुद परिमाण प्रमाणे) १०% इतकी रक्कम राष्ट्रीयकृत बँकेचा "महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे" यांचे नावे देय असलेल्या धनाकर्ष (Demand Draft) द्वारे लिलाव प्रक्रीया पार पडल्यानंतर बँकेच्या व कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसाचे आत वरिल पत्यावर तिवसा वखार केंद्र येथे जमा करणे बंधनकारक राहील. तद्नंतरच खरेदीदाराचा प्रस्ताव महामंडळाचे मुख्य कार्यालय पुणे येथे मंजुरीस्तव सादर करण्यात येईल. मुख्यालयाकडून प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या पुढील ७ दिवसाचे (सुट्टीचे दिवस वगळता) आत लिलावामध्ये बोलली गेलेली संपूर्ण रक्कम (अधिक वस्तू व सेवा कर ५%) साठा अधिक्षक, तिवसा यांचेकडे जमा करून ताबडतोब मालाची उचल करावी लागेल. मालाची उचल करण्यासाठी येणारा सर्व खर्च (जसे की वाहतूक, हमाली, वजन काटा इत्यादी) खरेदीदारास करावा लागेल.

जाहीर लिलावाची प्रक्रीया किंवा कोणतीही बोली, कोणतेही कारण न देता, स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार महामंडळाने राखून ठेवला आहे. सुट्टीचा दिवस वगळून कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेत वरिल वर्णन केलेला माल वखार केंद्रावर पहावयास मिळेल. अधिक माहितीकरीता साठा अधिक्षक, तिवसा यांचेशी संपर्क साधावा.

स्थळ - तिवसा
दिनांक - २३/११/२०२४

साठा अधिक्षक
वखार महामंडळ, तिवसा

Scanned with CamS